

देगलूर : देगलूर महाविद्यालयाचे अधीक्षक गोविंद जोशी यांची राज्य शासनाने समीतीवर नियुक्ती केल्यामुळे त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# राज्यस्तरीय समितीवर गोविंद जोशी यांची निवड

देगलूर, ता.१ (बातमीदार) : महाराष्ट्र शासनाने राज्यातील अकृषि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे प्रलंबित प्रश्न सोडविन्याबाबत शिफारस करण्यासाठी एक समिती गठीत केली असून त्यात शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे प्रतिनिधी म्हणून देगलूर महाविद्यालयातील कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबद्दल गोविंद जोशी यांचे आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, निवृती गोविंदवार आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner